# जिल्हा निवड समिती,जिल्हा परिषद, वर्धा

## पद भरती -२०१४

सामान्य प्रशासन विभाग,जि.प.वर्धा जाहिरात क्रमांक जिपव/साप्रवि/स्था-२/प्र.क्र.१०/वशि- १५३३ /२०१४,

दिनांक : २२ ऑगस्ट,२०१४

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा. नि. क्र. प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ व शासन निर्णय दिनांक २७ जून, २००८, व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.४५/१२, दिनांक ३ जून, २०१४ आणि महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. एपिटी-२०१४/प्र.क्र.१३९/आस्था-८, दिनांक ५ जुलै, २०१४ आणि महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दिनांक २४ जुलै, २०१४ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन-विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१३/प्र.क्र.२५४/भाग-२/२०१३/१६-ब, दिनांक २४ जुलै, २०१४ आणि महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, पत्र क्र. एपिटी-२०१४/प्र.क्र.४८/आस्था-८, दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ मधिल निर्देशानुसार वर्धा जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील खालील नमुद वर्ग -३ व वर्ग-४ ची रिक्त पदे सरळसेवेने स्पर्धा परीक्षा घेऊन भरावयाची आहे. प्रस्तुत पदावरील भरतीसाठी उमेदवारांकडून **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. <u>उपलब्ध पदसंख्या</u>** - आरक्षणानुसार भरावयाचा पदांचा तपशिल पदनिहाय खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | भरावयाची एकुण पदे | प्रवर्ग निहाय भरावयाची एकूण पदे | | समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (इतर) | वेतन श्रेणी | लेखी परिक्षेची दिनांक वार व वेळ | पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदविधर अंशकालिन | | | | |
| ०१ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) | ०९ | अ.जा | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | २ नोव्हेंबर, २०१४ रविवार सकाळी १०-०० ते ११-३० | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तिन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण केलेले. |
| | | | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | इमाव | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | खुला | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |
| | | | ईएसबीसी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | यामध्ये एक पद नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilities) OL- One leg करीता राखीव. | | | | | | | | | | | |
| | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) | ०१ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | २ नोव्हेंबर, २०१४ रविवार सकाळी १०-०० ते ११-३० | यंत्र अभियांत्रिकी या विषयातील शासन मान्यताप्राप्त संस्थेची पदवी किंवा पदविका (तिन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अहर्ता धारण केलेले. |
| | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (लघुसिंचन विभाग) | ०८ | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | २ नोव्हेंबर, २०१४ रविवार सकाळी १०-०० ते ११-३० | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तिन वर्षाचा पाठक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण केलेले. |
| | | | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | विजा-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | भज-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | | |
| | | | खुला | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |
| २ | औषध निर्माण अधिकारी | २ | खुला | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ५२००-२०२०० ग्रेड पे -२८०० | ८ नोव्हेंबर, २०१४ शनिवार सकाळी १०.०० ते ११.३० | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा/ उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. २) डि.फॉर्म उत्तीर्ण आवश्यक तसेच औषध निर्माता अधिनियम १९४८ डिप्लामा इन फार्मसी महाराष्ट्र स्टेट, मुंबई यांच्याकडील नोंदणीकृत असावा. |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ०३ | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ५२००-२०२०० ग्रेड पे - २४०० | ८ नोव्हेंबर, २०१४ शनिवार सकाळी १०.०० ते ११.३० | १.मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेली असावा.<br>२.विद्यापिठाची पदवी धारण करीत असलेल्या उमेदवारांमधून लेखाशास्त्र व लेखापरिक्षा हे विषय घेवन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील धारण करणा-या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखाविषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| | | | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| ४ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | ०६ | अ. ज. | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ५२००-२०२०० ग्रेड पे- २४०० | ८ नोव्हेंबर, २०१४ शनिवार दुपारी २.०० ते ३.३० | १)विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. २) राष्ट्रीय मलेरिया प्रतीरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून जिल्हा हिवताप अधिकारी यांचेकडे ९० दिवसापेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव. |
| | | | विजा-अ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |
| | | | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| ५ | ग्रामसेवक (कंत्राटी) | १० | अ.ज. | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | दरमहा एकत्रीत वेतन रुपये ६०००/- व रुपये ११००/- कायम प्रवास भत्ता | ९ नोव्हेंबर, २०१४ रविवार सकाळी १०-०० ते ११-३० | १. किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम ) किंवा शासन मान्य संस्थेची समाज कल्याणाची पदवी (बी.एस.डब्ल्यु.) आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारणकरणे आवश्यक राहील.<br>किंवा<br>२. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा समतुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका (दोन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारकांना प्राधान्य तसेच बी.टेक (ॲग्रो इंजीनियरींग) पदवीधारक आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारणकरणे आवश्यक राहील. |
| | | | इमाव | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |
| | | | खुला | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | | | |
| | | | ईएस बीसी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| ६ | आरेखक (ग्रापापु विभाग) | ०१ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ९३००-३४८०० ग्रेड पे- ४३०० | ९ नोव्हेंबर, २०१४ रविवार दुपारी २-०० ते ३-३० | स्थापत्य, यंत्र, विद्युत, अभियांत्रिकी यातील दोन वर्षाची पदविका किंवा समतुल्य अर्हता धारण करणारे उमेदवार. |
| ७ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १८ | अ. जा. | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ५२००-२०२०० ग्रेड पे- २४०० | ९ नोव्हेंबर, २०१४ रविवार दुपारी २.०० ते ३.३० | माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण झालेला असावा.<br>१. ज्यांनी १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्ष मुदतीचा पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवाराच्या बाबतीत शासकीय तंत्रशिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधिन |
| | | | अ. ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | खुला | १० | ३ | ० | १ | १ | ० | १ | २ | | | |
| | | | ईएस बीसी | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | एस बीसी -ए | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | राहून वयोमर्यादा ४० वर्ष इतकी शिथिल करता येईल. किंवा<br>२. आर्किटेक्चरल ड्रॉफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक) पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>३. कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक)पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>४. आरेखक (स्थापत्य) २ वर्षाचा पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण असावा. |
| ८ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ०३ | अ. ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | १६ नोव्हेंबर, २०१४ रविवार सकाळी १०-०० ते ११-३० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी. |
| | | | विजा-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | ०२ | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | १६ नोव्हेंबर, २०१४ रविवार सकाळी १०-०० ते ११-३० | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालकाकडून चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्र शिक्षण परीक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील. किंवा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ, नागपूर यांच्या मार्फत चालविण्यात येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्ध उत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा वैधानिक विद्यापिठामधील पशुवैद्यकिय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. |
| | | | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| १० | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | १८ | अ.जा. | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | १६नोव्हेंबर, २०१४ रविवार दुपारी २.०० ते ३.३० | १) एस.एस.सी. उत्तीर्ण आणि<br>२)टंकलेखन इंग्रजी-३० व मराठी-३० (श.प्र.मि.) किंवा<br>१.बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि. (६ महिने)<br>२.बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी /इंग्रजी /हिंदी ४० श.प्र.मि. (३महिने)<br>३.स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अँड स्टुडंटस (३ महिने) |
| | | | अ.ज. | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |
| | | | विजा-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | भज-क | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | खुला | ८ | २ | १ | ० | ० | ० | १ | ४ | | | |
| | | | ईएस बीसी | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | एस बीसी-ए | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | ०३ | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ५२००-२०२००<br>ग्रेड पे-१९०० | १६नोव्हेंबर, २०१४<br>रविवार<br>दुपारी २.०० ते ३.३० | १.माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण.<br>२. महाराष्ट्र शासनाच्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकिय परिक्षा विभाग शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण केलेला असावा किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळविलेला असावा.<br>३.इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल.<br>४.लेखाविषयक कामकाजाचा पुर्वानुभव असलेल्या उमेदवारास अधिक पसंती दिली जाईल. |
| | | | खुला | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| १२ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | ०२ | खुला | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ९३००-३४८००<br>ग्रेड पे-४२०० | २२ नोव्हेंबर, २०१४<br>शनिवार<br>सकाळी १०.०० ते ११.३० | सांविधिमान्य विद्यापिठाची विज्ञान, कृषि ,वाणिज्य किंवा वाङ्मय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर द्वितीय वर्गातील पदवी धारण करीत असतील किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल, किंवा पदवी व अनुभव दोन्ही असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. परंतु उक्त विषयापैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| १३ | कनिष्ठ लेखा अधिकारी | ०२ | खुला | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ९३००-३४८००<br>ग्रेड पे-४२०० | २२ नोव्हेंबर, २०१४<br>शनिवार<br>दुपारी २-००ते ३-३० | १.मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केली असावा.<br>२.व्यापारी भागीदार संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ५ वर्षाचा अखंड सेवेचा ज्यांना अनुभव असेल अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. या बाबतीत लेखाशास्त्र आणि लेखापरीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-यांना अथवा प्रथम वा व्दितीय वर्गातील पदवी धारण करणा-यांना अधिक पसंती दिली जाईल. किंवा<br>गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्यूत्तर पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. याबाबतीत कोणत्याही सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधिकरणातील लेखाकार्याचा अनुभव असणा-यास अधिक पसंती दिली जाईल. |
| १४ | परिचर (वर्ग-४) | ६८ | अ.ज. | ५ | २ | १ | ० | ० | ० | ० | २ | ४४४०<br>-<br>७४४०<br>ग्रेड पे-१३०० | २२ नोव्हेंबर, २०१४<br>शनिवार<br>दुपारी २.०० ते ३.३० | मान्यता प्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल. |
| | | | विजा -अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | भज-क | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | भज-ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | | |
| | | | इमाव | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |
| | | | खुला | ०५ | १० | ७ | २ | २ | १ | ० | १९ | | | |
| | | | ईएस बीसी | ९ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ५ | | | |
| | | | एस बीसी -ए | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | | | |

टिप :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ग्रामीण पाणी पुरवठा आणि कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) लघुसिंचन या पदांची पात्रता एकच असल्यामुळे प्रश्न पत्रिकेचे स्वरुप समान असल्याने व लेखी परीक्षेची दिनांक आणि वेळ एकच असल्यामुळे या दोन्ही पदासाठी एकच परीक्षा घेण्यात येईल. दोन्ही पदांची मिळून संयुक्त गुणवत्ता यादी तयार केली जाईल. व नियुक्तीचे पूर्वी कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध पदसंख्येनुसार उमेदवारास प्राधान्यक्रम विचारण्यात येईल व त्याप्रमाणे अंतिम नियुक्ती देण्यात येईल. त्यामुळे अर्ज करतेवळी उमेदवारास दोन्ही पदाकरीता एकच अर्ज भरावा लागेल. म्हणजेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या एकूण १४ ऐवजी १३ पदाकरीता परीक्षा घेण्यात येईल. तथापी जाहिरातीमध्ये नमुद आरक्षण व समांतर आरक्षर लागू राहील.

## ३. प्रश्न पत्रिका दर्जा व प्रश्न पत्रिकेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील :-

शासन परिपत्रक क्र. एपिटी २०१४/१३९/आस्था-८, दिनांक ५ जून, २०१४ सोबतचे परिशिष्ट - अ प्रमाणे.

| अ. क्र. | संवर्ग | प्रश्न पत्रिकेचा दर्जा | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधित प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बुध्दिमापन व गणित संबंधित प्रश्न | | तांत्रिक प्रश्न संबंधित प्रश्न | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | कनिष्ठ अभियंता | सर्व विषय एस.एस.सी.दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परिक्षा. | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| २ | औषध निर्माण अधिकारी | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ३ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | मराठी १२ वी दर्जा, लेखा विषयक प्रश्न इतर पदवी दर्जाची परिक्षा | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ४ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ५ | ग्रामसेवक (कंत्राटी) | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ६ | आरेखक | एस.एस.सी.दर्जा आरेखक संबंधी तांत्रिक प्रश्न | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ७ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ८ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परिक्षा | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | - | - | १०० | २०० |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | मराठी १२ वी दर्जा, विज्ञान व आरोग्य सबंधी प्रश्न पदविका दर्जाची परिक्षा | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| १० | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | - | - | १०० | २०० |
| ११ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | - | - | १०० | २०० |
| १२ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परिक्षा | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | - | - | १०० | २०० |
| १३ | कनिष्ठ लेखा अधिकारी | मराठी १२ वी दर्जा, लेखा संबंधी व इतर प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा. | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| १४ | परिचर (वर्ग-४) | इयत्ता ४ थी दर्जा | २० | ४० | - | - | २० | ४० | १० | २० | - | - | ५० | १०० |

## ४- पात्रताविषयक अटी :-

४.१ भारतीय नागरिकत्व व महाराष्ट्रातील रहीवासी असावा.

४.२ **वयोमर्यादा दिनांक १ जुलै, २०१४** रोजी किमान १८ वर्षे असावे. व ३३ वर्षापेक्षा (मागासवर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा) जास्त नसावे

४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरीता ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

४.३.२ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम.

४.३.३ माजी सैनिकासाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहील.

४.३.४ नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilities), प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, उमेदवारांकरीता ४५ वर्षे पर्यंत.
४.३.५ पदवीधर अंशकालीन बेरोजगार कर्मचारी (गट-क पदाकरीता ) ४६ वर्षा पर्यंत.

**५ परिक्षा शुल्क :-**

५.१ मागासवर्गीय उमेदवारांना रुपये १००/- (७५ + २५ बॅंक सेवा शुल्कासह ) व खुल्या प्रवर्गाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांना रुपये १७५/- (१५० + २५ बॅंक सेवा शुल्कासह ) इतके परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. (वरिल प्रमाणे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.)

**टिप - माजी सैनिक उमेदवारांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापी अर्जामध्ये माजी सैनिक प्रमाणपत्राचा क्रमांक नमुद करुन, प्रमाणपत्रे तपासणीचे वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.**

**६ अर्ज करण्याची पध्दत :-**

६.१ जाहिरात काळजीपुर्वक वाचावी. उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यांत येणार आहे. परिक्षेसाठी विहित केलला अर्ज www.zpwrdrecruitment.com या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. त्यावर संपर्काकरीता दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करुन संपूर्ण नाव, जन्म दिनांक, जात इत्यादी (अर्जामधील संपूर्ण माहिती)माहिती भरल्यानंतर Application ID तयार होईल त्याचबरोबर चलान तयार होईल सदर चलानची प्रिन्ट आऊट काढून चलान बॅंकेत भरुन Journal No प्राप्त करुन घ्यावा. **(Application ID व Journal No उमेदवारांनी सांभाळून ठेवणे आवश्यक आहे.)**

६.२ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

**६.३ पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज www.zpwrdrecruitment.com या वेबसाईटव्दारे दिनांक 15/9/२०१४, सायंकाळी ६.०० पर्यत सादर करणे आवश्यक राहील.**

**६.४ चलानव्दारे परीक्षा शुल्क भरण्याची विहित कार्यपध्दती :-**

विहित पध्दतीने www.zpwrdrecruitment.com या संकेतस्थळावर अर्ज भरल्यानंतर, **परीक्षा शुल्क चलान व्दारे बॅंकेत भरावे.** भरती प्रक्रीये अंतर्गत अर्ज करण्यासाठी परीक्षा शुल्क चलान Bank of India च्या कोणत्याही शाखेत भरता येईल. याकरीता उमेदवारास **www.zpwrdrecruitment.com** या संकेत स्थळावर अर्ज केल्यानंतर चलानच्या तीन प्रतिची प्रिन्ट Print घेता येईल. या संकेतस्थळावरुन तयार झालेले चलान उमेदवाराने बॅंक ऑफ इंडियाच्या शाखेत (Bank of India) भरण्यासाठी वापरावे. सदर बॅंकेत हे चलान भरल्यानंतर या बॅंकेचा Journal No. तयार होईल, जो की उमेदवाराच्या चलान पोचपावतीवर बॅंकेमार्फत लिहून देण्यांत येईल. फक्त Bank of India यांच्याच शाखेतून हे चलान भरण्यांत यावे. या Journal No. ची बॅंकेत भरलेल्या प्रत्येक रक्कमेच्या Journal No. शी पडताळणी केली जाईल. ज्या उमेदवारांचे Journal No. बॅंकेशी जुळतील अशा उमेदवारांनाच पात्र करण्यांत येईल.

**परिक्षा शुल्कासंबधी विशेष सुचना :-** वरील ऑनलाईन शुल्का व्यतिरिक्त डी. डी. (धनाकर्ष)/धनादेश/इंडियन पोस्टल ऑडर इ. कोणत्याही माध्यमाव्दारे शुल्क स्विकारले जाणार नाही. फक्त Bank of India बॅंकेत विहित चलानव्दारे भरणा केलेले शुल्कच ग्राहय धरण्यांत येईल. इतर बॅंके मार्फत भरलेले चलान Journal No मध्ये टाकल्यास पडताळणी करते वेळेस सदर उमेदवारास अपात्र करण्यांत येईल. व त्याबाबत उमेदवाराची कोणतिही तक्रार अथवा आक्षेप ऐकून घेतले जाणार नाही.

६.५ परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

६.६ उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या परीक्षेच्या आधी ५ दिवस आधीपासून परीक्षेच्या दिवसापर्यत प्राप्त करता येईल. उमेदवाराने परिक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. **प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवाराने जन्म तारीख व Application ID, www.zpwrdrecruitment.com या संकेतस्थळावर Login करावे. सदर Login होताबरोबर उमेदवारास त्याचे प्रवेशपत्र प्राप्त करता येईल.**

६.७ परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

७ सदर्हु जाहिराती मध्ये दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. जाहिरातीत दिनांक ३० एप्रिल, २०१५ पर्यत सेवानिवृत्तीमुळे व इतर कारणामुळे रिक्त होणारी पदे दर्शविण्यात आलेली आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी / जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. तसेच सदर्हु पदे जसे जसे रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना जिल्हयात कुठेही देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

८ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक /प्रशासन/२०००/प्र.क्र. ५/२००१/३२, दिनांक २०/७/२००२ व त्या अनुषंगिक शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे शासनाने निर्देशित केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. (पदास अनुसरुन)

९ उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१० वेगवेगळया पदासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल. परंतू एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.

११ उमेदवाराने यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे / एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय / जिल्हा सैनिक कार्यालय व जिल्हा पुनर्वसन कार्यालय येथे नोंदवल असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

१२ एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१३ नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilities)आरक्षित पदे शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ नुसार नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilities)उमेदवाराची निवड झाल्यानंतर ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्यांना त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल.

१४ पदाची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत समान गुण धारण करणा-या उमेदवारांच्या निवडीबाबत शासन निर्णयात दिलेल्या सुचनांच्या अधीन राहून निवड केल्या जाईल.

१५उमेदवारांची निवड लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनूसार करण्यांत येईल. पदाची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता समान गुण धारण करणा-या उमेदवारांच्या निवडीबाबत शासन निर्णयात दिलेल्या सुचनांच्या अधीन राहून निवड केल्या जाईल.

१६ कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार , पदांची संख्या , समांतर आरक्षणाबाबत बदल करणे. परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती, वर्धा यांनी स्वत:कडे राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. अन्यथा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१७ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१८ या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

१९ भरती प्रक्रिये सबंधी देण्यात येणा-या सुधारीत व अद्यावत सुचना कार्यालयीन फलकावर व www.zpwrdrecruitment.com या सांकेतीक स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२० म.शा.ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचा शासन निर्णय क्र.अपंग-२०१०/प्र.क्र.२५०/आस्था-९, दिनांक १४ जानेवारी, २०११ नुसार नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilitics) पदाकरीता (Disabilities) अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असने आवश्यक आहे.

२१ महाराष्ट्र राज्य लोकसेवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती ) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक) हा अधिनियमातील नियम क्रमांक ४(२)(दोन) खालील पदान्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक /८२/२००१/मसेआ-००/प्र.क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ मधील तरतूदी नुसार महिला करीता राखीव असलेल्या पदाचा फायदा घ्यावयाचा आहे त्या **महिला उमेदवाराकडे नॉन क्रिमिलेंअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

२२ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०.४.२००५ मधील तरतुदीनुसार राहील.

२३ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११-१६-ब दिनांक १२ डिसेंबर,२०११ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीय जात प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर करण्याच्या अटीवर नियुक्ती दिली जाईल. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपुर्ण प्रस्ताव कार्यालया मार्फत समितीकडे सादर करुन वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटिस न देता सेवा समाप्त करण्यात येईल. (अनुसूचित जमाती उमेदवार सोडून)

२४ नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याचप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल. याबाबत सर्व उमेदवारांना वर्तमान पत्रातून जाहिरातीद्वारे व जिल्हा परिषदेच्या संकतस्थळावरुन कळविण्यात येईल.

२५ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २७ जून, २००८ नुसार उमेदवारानी अंतीम गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

२६ जाहिराती मधील काही बाबी विषयी शंका असल्यास त्यांनी संबधित खातेप्रमुख जि. प. वर्धा यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.

२७ उमेदवारांनी Application I D नंबर व सादर केलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी.

२८ उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, पात्रता, वर्गवारी इत्यादी तपासून अर्ज करावा.

२९ ऑनलाईन अर्ज भरतांना उमेदवारानी त्याच्या फोटोची साईज २० ते ५० केबी (किलो बाईट्स) व १० ते २०केबी (किलो बाईट्स) स्वाक्षरी स्कॅन करुन अर्ज भरावा.

३० उमेदवारांना परीक्षे संदर्भात माहिती SMS व्दारे त्यांनी दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल.

३१ परिक्षेच्या २ तासानंतर संवर्गनिहाय उत्तरपत्रिका जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर आणि जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३२ उत्तरपत्रिका प्रसिध्द केल्यानंतर त्यावर काही आक्षेप असल्यास २४ तासाचे आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, वर्धा यांचे कार्यालयात सादर करावे.त्यानंतर अंतिम उत्तरपत्रिका प्रसिध्द केल्या जाईल. अंतिम उत्तरपत्रिकेवर कोणतेही आक्षेप मान्य केल्या जाणार नाही.

३३ कोणताही अर्ज करणारा उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता, पात्रता धारण करीत नसल्याचे किंवा त्यांचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य बरोबर नसल्याचे आढळल्यास त्यांची उमेदवारी /नियुक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यांत येईल.

**३४ ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर बँक ऑफ इंडियाचे कोणत्याही शाखेमध्ये चलान भरण्याची मुदत दिनांक 26/ 8 /२०१४ ते 18 / 9 /, २०१४ पर्यत सकाळी १०-३० ते ४-०० वाजेपर्यत राहील.**

३५ उमेदवारानी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्ती नुसार पात्र आहे असे समजून लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

**(उदय चौधरी,भा.प्र.से )**
**सदस्य जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**(एन.नवीन सोना,भा.प्र.से.)**
**अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, वर्धा**